ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# शिवकालीन महसूल व्यवस्था : एक अभ्यास

**प्रा. गिरी सचिन रमेश**
सह प्रा.
मधुशाली कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, सलगरा दि.

**संक्षेप** – मराठी राज्याच्या उत्पन्नाचा विचार करता किती प्रकारे कर आकारले जात होते याची कल्पना येते. समाजातील कोणताही घटक करापासून मुक्त नव्हता. सरकारी खजिण्यात प्रत्येकाला काहीं ना काही भर घालावी लागत होती. मिठावरील करातून तर कोणाचीही सूटका नव्हती. मध्य काळात उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती असल्यामुळे शेतसारा चुकविता येत नव्हता. कारण सरकारची सारी मदार जमिन महसूलावरच होती.

**बीज शब्द** :– छत्रपती शिवाजी महाराज यांची महसूल विषयक धोरण, महसूल कर पध्दत, सरदेशमुखी आणि चौथाई इ. तत्वज्ञान

**प्रस्थावना** :– प्रत्येक स्वतंत्र राज्याची काही कायम स्वरूपाची ध्येय धोरणे असतात. त्या शिवाय राज्याचे स्वतंत्र व सार्वभौम स्वरूप दिसून येत नाही. राज्यांच्या निश्चित ध्येय धोरणामुळे राज्यकारभाराची दिशा स्पष्ट होते. त्याला विशिष्ट असा द्रष्टीकोण प्राप्त होत असतो. ते त्या त्या राज्याचे नैतीक अधिष्ठान बनते. त्यावरच राज्याची भरभराट होत असते. राज्याचे अस्तित्व टिकून आपले सार्वभौमत्व देखिल अबाधित राहते.

मराठयांच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीला अद्वितीय महत्व आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापणा केली. वडीलार्जीत जाहागिरीमध्ये धैर्य, शौर्य, चातूर्य आणि राजकीय मुत्सद्‌देगिरी यांचा अवलंब करून त्या छोटयाश्या जहागिरीचे स्वतंत्र राज्यात रूपांतर केले. शिवाजी महाराज जसे उत्तम योध्ये, युध्द शास्त्र निपून, लोकहितवादी, प्रजाहितदक्ष, महापराक्रमी, धर्मसहिष्णू राजे होते. तत्वतच ते ' बहुत जनासी आधारू ' असे श्रीमंत योगी जाणते, रचनात्मक कार्य करणारे काळाच्या पूढे जाणारे मुत्सद्दी, उत्तम प्रशासक शेतकरी व कष्टक–यांचे कैवारी होते. राज्य सर्वांचे आहे रयतेचे आहे हा आत्मविष्वास त्यांनी प्रजेमध्ये निर्माण केला.

प्रत्येक कालखंडातील शासकाने तत्कालीन काळात कृषी विषयक धोरण ठरवले होते. काही शासकांचे धोरण हे अन्यायकारी होते तर काहींचे जनकल्यानकारी होते. अन्यायकारी पध्दतीतूनच कृशी कर व्यवस्था जन्माला आली. जमिनदार व सावकार यांच्या कडून मोठया प्रमाणात शेतकऱ्यांची पिळवणूक करण्यात आली. हे धोरणवजन्मापर्यंत असेच सुरू राहीले.परंतू शिवकाल खंडामध्ये महाराजांनी बदल केलेला दिसून येतो.

**संशोधन पध्दती** :– प्रस्तूत संशोधन निबंधासाठी दुयम संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्या मध्ये ऐतिहासिक संदर्भग्रंथ, साप्ताहिके, इ. दूय्यम साहित्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**उद्‌देश**

1. शिवकालीन महसूल व्यवस्था जाणून घेणे.
2. शिवरायांचे शेतकरी कष्टकरी यांच्या बद्‌दलची तळमळ याचा आभ्यास करणे.
3. शिवकालीन उत्पनाच्या प्रमुख साधनांची माहिती घेणे.
4. शिवाजी महाराजांचा लोक कल्याणकारी दृष्टीकोन जाणून घेणे.

**गृहितके**

1. शिवकाळात महसूल अधिकारी सरकारी नियुक्त होते.
2. शिवकाळातील राज्यांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती हे होते.
3. शिवाजी महाराजांचे शेती विषयक धोरण शेतकरी पूरक होते.

**शिवाजी महाराजांची महसूल व्यवस्था** :– न्या. रानडे यांच्या मते शिवरायांची सर्वश्रेष्ठ कामगिरी म्हणजे स्वराज्य अथवा राष्ट् निर्मिती हे होय. मात्र थोडी दुरूस्ती करून असे म्हणता येईल की त्यांनी निर्माण केलेली नूतन सष्टी टिकून ठेवण्यासाठी ही सत्ता आर्थिकदृष्टया प्रबळ करण्याचा काटोकाट प्रयत्न केला. यासाठी त्यांनी शेती व्यवसाय उद्योग विकास व त्यातून उत्पन्नात वाठ कशी होईल याचा सतत विचार करून आपले आर्थिक धोरण निश्चित केले.

शिवाजी महाराजांच्या महसूल पद्‌धतीवर निजामशाही, आदिलशाही व मोगलयांच्या महसूल पद्‌धतीचा कमी अधिक प्रभाव पडलेला दिसून येतो. डॉ. बाळकृष्ण 'शिवाजी द ग्रेट' या ग्रंथात लिहितात 'शिवकाळात विजयनगर, निजामशाही, आदिलशाही व मोगलशाही अशा चार सामशज्यातील पद्‌धतीचा मिलाफ करण्याचे आवघड काम शिवाजी महाराजांच्या पुढे होते.' प्रत्येकाच्या आधिका–याची श्रेणी ही वेगळी असे त्यांचे अधिकार महसूलाची आकारणी तसेच जमिन महसूल व इतर उत्पन्नाची साधणे यामध्ये सुद्‌धा फरक असे. अशा स्थितीत या सर्व पद्‌धतीमधील चांगले गुण घेऊन दोष काढून टाकण्याचे महत्वाचे काम महाराजांनी केले. 17 व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात

जी राजकीय धामधूम होती तीचा फायदा घेऊन शिवाजी महाराजांनी स्वतःची अशी महसूल पद्धत महाराष्ट्रात लागू केली. शिवाजी महाराजांच्या काळात जमीन महसूल हाच महसूलाचा मुख्य आधार होता. महसूलाच्या वसूलीसाठी राज्याचे दोन भाग पाडण्यात आले होते.

1. **स्वराज्य** : स्वराज्य म्हणजे शिवाजी राजांच्या ताब्यात असलेला प्रदेश
2. **मोगलाई** : मोगलाई म्हणजे मोगलाईच्या ताब्यात असलेला पण शिवाजी महाराजांना खंडणी देणारा प्रदेश

**महसूल विभागाची रचना**

1 विभाग होते एका विभागात अनेक सुभे असत.
2. सुभा :– दिड ते तीन लाख होन महसूल जमा होणारा प्रदेश
3. परगणा :– परगण्यात चाळीस ते साठ खेडयांचा समावेष होत होता.
4. महाल कार्यात
5. तपे तर्फ :– हा सर्वात छोटा विभाग होता.

शिवाजी महाराजांच्या जमिन महसूलाच्या संदर्भात खालील तीन व्यक्तींनी सहकार्य किंवा प्रयत्न केले ते प्रयत्न कोणी व कोणत्या वर्षी केले ते या प्रमाणे

1. दादोजी कोंडदेव :– इ. स. 1636
2. मोरोपंत पिंगळे :– इ. स. 1648
3. अण्णाजी दत्तो :– इ.स. 1678

दादोजी कोंडदेव यांनी लागवडीखाली आणलेल्या जमिनीवर पुढील प्रमाणे कर आकारणी केली.

1. पहिल्या वर्षी बिघ्याला 1
2. दुस–या वर्षी 1 बिघ्याला 3
4. चौथ्या वर्षी 1 बिघ्याला 9
5. पाचव्या वर्षी 1 बिघ्याला 10
6. सहाव्या वर्षी 1 बिघ्याला 20

जमिन महसूलाची आकारणी करताना पुढील तीन घटक विचारात घेतले जात.

1. जमिनीची प्रत
2. जमिनीस मिळणारे पाणी
3. जमिनीत काढलेले पिक.

एकाच वर्षात जमिनीत किती व कोणती पिके घेतली जातात ही बाब विचारात घेतली जाईल.शेतसारा आकारणी करताना लागवडीखाली असलेल्या जमिनीचा विचार केला जाई. पडीक जमिन, जंगले, कुरण इ. जमिन जी एकूण गावच्या मालकीची असे त्यावर सारा आकारणी केली जात नसे. सारा आकारणी करताना नगदी पिक, खरीप पिक, रब्बी असे वर्गीकरण केले जाई. उस पिकासाठी सरकारी कालव्याचे पाणी घेतले असेल तर आडीच होन सारा एका बिघ्यास आकारत. जर उसासाठी विहिरीचे पाणी वापरले असेल तर दोन होन सारा एका बिघ्यास आकारला जाईल. जेंव्हा डोंगराळ व पडिक जमिन लागवडीखाली प्रथम आणली जाईल तेंव्हा प्रथम काहीं वर्ष सारा आकारला जात नसे; पण नंतर मात्र या जमिनीवरही सारा आकारणी केली जाई पण ती मापक असे. बागायती जमिनीवरचा सारा आकारताना कालव्याचे पाणी व विहिरीचे पाणी हा फरक ही विचारात घेतला जाई. सारा आकारणी बाबत शेतक–यांची काही तक्रार असेल तर त्याची राहनिषा केली जात असे. गावच्या पाटलास दप्तरात दुरूस्ती नोंद करण्याचा आदेश दिला जात होता.

आण्णाजी दत्तो यांनी शिवाजी महाराजांच्या काळात महसूलाची पुनर्रचना केली होती. प्रथम प्रत्येक गावातील लागवडीखाली असणा–या जमिणीची यादी तयार करून प्रत्येक जमिनीत कोणते पिक येते याच्या यादया तयार करण्यात आल्या होत्या. डोंगराळ, दलदलीची व काळी जमिन या गटात जमिनीचे वर्गीकरण केले जाई. जमिन मोजण्यासाठी काठीचा वापर केला जात असे. त्या काठीला शिवशाही काठी म्हणत ती काठी पाच हात लांब व पाच मुठी लांबीची असे. वीस चौरस काठयांचा एक पांड व वीस पांडाचा एक बिगा होई. 120 बिघ्याचा एक चावर होत असे. जमिनीच्या मोजणीचे काम महारांकडे असे. जमिनीची प्रत ठरवित असताना 1,2,3,4 असे गट पाडले जात त्यास अव्वल, दमू, सीम व चारहम अषी नावे होती.

**महसूल अधिकारी** :– शिवाजी महाराजांनी पुढील महसूल अधिकारी वर्गाच्या नेमनूका केल्या. प्रांताच्या प्रमुखाला सुभेदार म्हणत. त्याच्या मदतीला खालील अधिकारी होते. 1. दिवाण, 2. मुजुमदार, 3. फडणीस, 4. सबनीस, 5. कारखानीस, 6. चिटणीस, 7. जमादार, 8. पोतनीस. सुभेदाराला 400 होन पगार होता तर मुजुमदारास 100 ते 125 होन पगार होता. सर्व महसूल अधिकाऱ्यांना रोख पगार दिला जाई. शिव पूर्व काळात गावच्या महसूलाची विक्री बोली लावून केली जात असे. त्यात जनतेचे प्रचंड शोषण होई. पण छत्रपती शिवाजी महाराजांनी ही पद्धत बंद केली. त्यांनी जमिनदारी पध्दतीऐवजी रयतवारी पध्दत सुरू केल्याने सामान्य शेतकरी–राजा यांच्या प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाले. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सा–यात सुट देण्याची पध्दत त्यांनी अमलात आणली. शिवाजी महाराजांच्या महसूल पध्दतीमुळे जनतेचा फायदा झाला असे मत ग्रॅड टफ ने हिष्ट्री ऑफ द मराठास' या ग्रंथात मांडले.

संभाजीराजाला शिवाजी महाराजांच्या एकूण प्रशासनात सुधारणा करण्याची संधी मिळाली नाही. एक तर त्यांची कार किर्द 9 वर्षाची व तिही युदधस्थितीतील होती. राजाराम महाराजांना संकटामुळे सुधारणा करणे शक्य झाले नाही. त्यामुळे शिवाजी राजांनी निर्माण केलेले प्रशासन पेशवाईस प्रारंभ होईपर्यंत कायमच होते.

**शिवाजी महाराजांची कर पध्दती :–** जमिन महसूल हे शिवकाळात महत्वाचे साधन होते. त्याशिवाय जे कर लावले जात ते खालीलप्रमाणे होते.

1. पायपोसी :– चांबारावरील कर
2. सिंहासनपट्टी :– राज्याभिशेकाच्या वेळी सिंहासन पट्टीद्वारे पैसा उभा केला जाई.
3. मोहतरफा :– व्यापा–याकडून हा कर वसूल केला जाई.
4. सराफी पट्टी :– सोन्याचांदीचा व्यवसाय करणा–यावर हा कर लावला जाई.
5. जकात कर :– पर राज्यातून स्वराज्यात येणा–या व स्वराज्यातून बाहेर जाणा–या प्रत्येक वस्तूवर कर लावला जाई.
6. कारागिरावरील कर :– परीट, सुतार, शिंपी, नाव्ही, सोनार, गुरव, कुंभार, कोळी इ. फ व्यवसायिकावर हा कर होता.
7. मिठावरील कर.
8. मेटवाणी पट्टी :– सरकारी अधिकारी किंवा साधुसंत फिरतीवर असताना त्यांच्या खाण्यापिण्यासाठी म्हणून हा कर वसूल केला जाई
9. मांग टाका :– हा कर साळी, कोष्टी, मोमीन या विणक–यांकडून वसूल केला जाई.

असे वरील कर असून जंगलापासून मिळणारे उत्पन्न, टाकसाळी पासून मिळणारे उत्पन्न, मच्छीमार व खाणीपासून मिळणारे उत्पन्न ही उत्पन्नाची प्रमुख साधने होती. त्या शिवाय दंड न्यायालयीन शुल्क, बेवारस मालमत्ता, सरजामदार व संस्थानिक यांच्याकडून मिळणारी खंडणी, युद्धात मिळालेली लुट, गुप्त धन इ. उत्पन्नाची प्रमुख साधने होती.

**चौथाई व सरदेशमुखी :–**चौथाईचा अर्थ राष्ट्राच्या /राज्य /प्रदेशाच्या उत्पन्नाचा चौथा हिस्सा होय. चौथाईची पध्दत शिवाजी महाराजांनी सुरू केलेली नाही. शिवपूर्वकाळात प्रबळ राजे दुबळया राज्याकडून चौथाई वसूल करत असत. **डॉ. एस. एन. सेन** यांच्या मते चौथाई म्हणजे शत्रू पासून आपल्या प्रदेशाचे संरक्षण होण्यासाठी किंवा लुटीपासून संरक्षण मिळविण्यासाठी दयावयाचा कर होय. **सर जदुनाथ सरकार** यांच्या मते शिवाजी महाराजांची चौथाई म्हणजे एक प्रकारची खंडणी होय. ही खंडणी त्यांचे सैन्य नियमितपणे वसूल करीत असे. ही रक्कम एकूण जमिन महसूलाच्या उत्पन्नाच्या 1/4 इतके असे. चौथाईचा हक्क जिंकलेल्या प्रदेशातून किंवा शत्रूच्या प्रदेशातून चौथाईची रक्कम गोळा केली जात असे. इ.स. 1668 नंतर चौथाई हक्क देण्यासंबंधी आदिलशाही व कुतूबशाही या सत्तांशी शिवाजी महाराजांनी करार केले होते. आदिलशाही व कुतूबशाही कडून अनूक्रमे दर वर्षी 3 व 5 लक्ष होन चौथाई वसूलीचा हक्क मिळवला होता. पोर्तूगिज सत्तेकडून शिवाजी महाराजांनी चौथाई वसूल केली. सभासद बखरीमध्ये शिवाजी महाराजांना चौथाईपासून 80 लाख होन एवढे उत्पन्न मिळाले असे म्हंटले आहे.

सरदेशमुखी ही कल्पना चौथाई पासून भिन्न आहे. चौथाई ही शस्त्रास्त्राच्या बळावर कोणत्याही प्रदेशातून वसूल केली जात होती. शिवाजी महाराजांनी आपण महाराष्ट्राचे वर्ष परंपरागत सरदेशमुख आहोत व आपणास सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क आहे असा दावा माणला व सरदेशमुखी वसूल करण्यास सुरूवात केली. **न्या. एम. जी. रानडे** यांच्या मते शिवाजी महाराजांचा सरदेशमुखी वरील हक्क सन 1650 पासून वसूल करीत असे. **डॉ. एस. एन. सेन** यांच्या मते शिवाजी महाराजांचा सरदेशमुखीवरील हक्क हा त्यांना वंश परंपरेने प्राप्त झाला होता. मुस्लिम इतिहासकार **काफीखान** हा सरदेशमुखीच्या हक्काबाबत म्हणतो मराठयांच्या चौथाईशिवाय जहागिरदारांकडून व रयतेकडून 10 टक्के सरदेशमुखी मिळत असे.

## निष्कर्श

1. शिवकाळात महसूल अधिकारी हे सरकार नियूक्त असून त्यांना रोख पगार दिला जाई.
2. शिवकाळात महसूलाचे मुख्य आर्थिक स्त्रोत शेती हाच होता.
3. शिवरायांचे शेती विषयक धोरण शेतकरी हिताचे होते.
4. ग्राम हा शिवकालीन प्रशासनाचा कणा होता.
5. शिवकाळात धान्य किंवा पैशाच्या स्वरूपात सारा घेतला जाई.

## *संदर्भ सुची*


1. *खोबरेकर. वि. गो., महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड, भाग 1 शिवकाल, महाराष्ट् राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमाव्रत्ती, नोव्हें 2006, पृ क्र. 469*
2. *खोबरेकर. वि. गो, पूर्वोक्त प्र क्र. – 470*
3. *कुलकर्णी अ. रा., अशी होती शिवशाही, राजहंस प्रकाशन, प्रा. लि. पुणे आवृती पाचवी, सप्टें 2012 प्र. क्र. 50*
4. *गाठाळ एस.एस., मराठयांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन औरंगपुरा, औरंगाबाद प्रथमावृत्ती जुलै 2010 प्र. क्र. 221*
5. *गाठाळ एस. एस., पूर्वोक्त प्र. .क्र. 226*